# विधवा महिलांची सद्यस्थिती आणि स्व: सक्षमीकरणाची भूमिका

**कु. संगीता वासुदेवराव कुबडे**, संशोधक, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर sangeeta9764496732@gmail.com

**डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे** सहाय्यक प्राध्यापक व मार्गदर्शक एफ. ई. एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर.

---

**प्रस्तावना**:

पती निधन होणे ही एक दुर्दैवी घटना आहे. ज्यामुळे त्या विधवेला कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शिक्षणिक, मानसिक आणि शारीरिक अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. मुलांचे पालनपोषण, घरगुती कामे, उदरनिर्वाह, त्यांचे भविष्य, शिक्षण, मुलींचे लग्न अशा चिंतेच्या अनेक बाबी त्रासदायक ठरतात. थोडक्यात, विधवांची सद्यस्थिती साने गुरुजीच्या लिखाणातून आपणास लक्षात येण्यासारखी आहे. ते म्हणतात, "सर्वांची सेवा हे तिचे काम. कोणाची बाळंतपणे करील, कोणाचे स्वयंपाक करील, कुठे कुटुंबात अडले, की तिकडे झाली तिची पाठवणी. तिला मोकळीक नाही, आनंद नाही. जगातील सारे अपमान सोसुण जगाचे भले चिंतणे हे तिचे ध्येय असते. भगवान शंकर हलाहल पिऊन जगाचे कल्याण करतात. तसेच ती निंदा, अपमान, शिव्याशाप यांचे विष मुकाट्याने पीत असते आणि पुन्हा सेवेस सिद्ध आदर्श विधवा जगाची सुरु आहे ! ती संयम व सेवा यांची मुर्ती आहे. स्वतःचे दुःख गिळून जगासाठी झटणारी देवता आहे. भारतीय संस्कृतीत हा महान आदर्श आहे. अशा दिव्य देवतेसमोर सतरांदा लग्न करणारे पुरुष सुकरासारखे वाटतात आणि या स्त्री जातीची धन्यता वाटते.[१]

अशी परिस्थिती बऱ्याच ठिकाणी कमी जास्त फरकाने पाहायला मिळते. त्यात शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याकारणास्तव शासनाचे कायदे, धोरणे, योजना अशा महत्त्वाच्या बाबींपासून निरक्षर विधवा दूर राहिल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. बऱ्याच विधवा योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. सरकारकडून लाभ मिळतो तो अगदी कमी असल्याने आवश्यक गरजा देखील पूर्ण करणे कठीण जाते. काही ठिकाणी तर असे पाहायला मिळते, की विधवांना घरातून हाकलून दिले जाते. त्यांना स्वतःच्या लेक सुनांकडून दोन वेळचे जेवण सुद्धा मिळणे कठीण जाते. घरातून काढून दिलेल्या किंवा कुटुंबांना ओझे झालेल्या विधवा असुरक्षित आहेत. अशा विधवा वाराणसी येथील वृंदावन या ठिकाणी राहायला जातात. तेथे त्या फक्त मृत्यूची वाट पाहतात आणि अशा विधवांचे प्रमाण फार जास्त आहे. म्हणूनच या शहरास "विधवांचे शहर" म्हणून ओळखले जाते. शासनाकडून मिळणारे अनुदान ही इतके कमी असते, की त्यात त्यांचा आवश्यक खर्च देखील होऊ शकत नाही. बऱ्याच योजनांचा लाभ तर गरजूंपर्यंत पोहचत सुद्धा नाही. याचा विचार करून निराधार विधवांसाठी ना नफा तत्वावर देशात अनेक संस्था विधवांसाठी कार्य करतात. त्यातील 'मैत्री' ही एक संस्था आहे. जेथे रोज ५०० विधवा दुपारच्या वेळी विनामूल्य जेवणासाठी एकत्र येतात. त्यांना विनामूल्य आरोग्यसेवा, औषधे पुरवली जातात. मैत्रीचे संस्थापक विना सिंग म्हणतात, "The Social welfare system in India is practically non-existent, All widows over the age of 60 are eligible for a Small government pension worth less than 5 a month. But most are illiterate and do not have bank accounts to access even that." "How can someone getting 300 rupees or less than 5 survive?" Says Ms. Singh, 'How are they going to hire a room to live, by rations etc.? Even if you give them a below the poverty line card, that doesn't give them anything free.' सरकारकडून दिले जाणारे अत्यंत कमी मानधन, गरिबी, आरोग्याची व सामाजिक सुरक्षेची अशी अवस्था असणाऱ्या देशात विधवांची अशी स्थिती हा एक चिंतेचा विषय बनला आहे. भारत जरी तरुणांचा देश असला तरी संयुक्त राष्ट्रांनी इशारा दिला की, वृद्धांच्या ९% संख्येत तिप्पट वाढ होऊ शकेल आणि पुढील ४० वर्षात ३०० दशलक्षपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. एकंदरीत असे चित्र विधवा, विधुर किंवा संपूर्ण वृद्ध लोकांच्या अवस्थेवरून दिसून येते.[२]

**उद्देश**:

१. विधवा महिलांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

२. विधवापणात स्व: सक्षमीकरणाची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक पद्धतीचे असून यामध्ये संशोधन पत्रिका, लेख, ग्रंथ, इत्यादी दुय्यम संशोधन साहित्याच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहे.

**विश्लेषण व चर्चा** :

पूर्वीच्या तुलनेत आज समाजात विधावांकडे पाहण्याचा दृष्टीकोन काही प्रमाणात बदलल्याचे दिसते. पूर्वीप्रमाणे आज विधवा पांढऱ्या साडीत दिसत नाहीत. विधवांच्या राहणीमानातही बदल झाल्याचे दिसून येते. त्या शिकून नोकरी किंवा मजुरी करत आपल्या कुटुंबाचा सांभाळ करतांना दिसतात. परंतु एवढ्यावर विधवांच्या आयुष्यात संपूर्णच चांगले बदल झाले, असे म्हणता येणार नाही. आजच्या काळात अनेक समस्या आहेत. ज्यांना सामोरे जात विधवा महिला आपले जीवन जगतात.

विधवा महिलांची सद्यस्थिती व समस्या :

विधवांच्या नावे काही संपत्ती असेल किंवा स्वतःची पतीची पेन्शन येत असेल तर त्या लालसे पोटी काही कुटुंबात विधवेचा सांभाळ केला जातो. जास्त प्रमाणात तर पतीच्या नावे असलेली संपत्ती, जमीन किंवा इतर बँक बॅलेन्स घरातील इतर व्यक्ती विधवेच्या हातीच लागू देत नाहीत. तिला फसवून माघारीच ती संपत्ती आपल्या नावे करण्याचे प्रकार घडतात. तुरळकच ठिकाणी विधवांचा चांगल्या प्रकारे सांभाळ केला जातो. सर्वच विधवांच्या काही ना काही समस्या असतात. फक्त त्या वेगवेगळ्या असल्याचे लक्षात येते. राम अहुजा यांच्या मते, 'सर्व विधवा महिलांना त्यांच्या श्रेणीनुसार वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते. ज्यात पहिली श्रेणी मुली विवाहानंतर दोन वर्षातच विधवा होतात. दुसऱ्या श्रेणीत विवाहित महिला ५-१० वर्षानंतर विधवा होते. अशा विधवेला एक किंवा दोन अपत्य असतात. तिसरी श्रेणी ५० वर्षानंतर काही महिला विधवा होतात. या श्रेणीपैकी दुसऱ्या श्रेणीतील विधवांना इतर श्रेणीतील विधवांच्या तुलनेत जास्त समस्यांना सामोरे जावे लागते. कारण तरुण वयात कुटुंबाचा व अपत्यांचा सांभाळ करण्याची मोठी जबाबदारी विधवेच्या खांद्यावर येते. पहिल्या व तिसऱ्या श्रेणीतील विधवांना देखील समस्या असतात परंतु तुलनेत कमी असतात. त्यांना जास्त जबाबदारी दिसून येत नाही. ५० वर्षाच्या पुढील विधवांना सहसा नातवे सांभाळण्याची जबाबदारी असते. कारण मुले, सुना मजुरी किंवा नोकरी निमित्य बाहेर जात असल्याने त्यांच्यावर ही जबाबदारी देण्यात येते.'[३] परंतु सर्वच ठिकाणी अशी परिस्थिती दिसून येत नाही पन्नाशीनंतर देखील बऱ्याच विधवांना मजुरी करावी लागते अनेक विधवांना तर घरातून काढून दिले असल्याने स्वतःचा सांभाळ स्वतःच करावा लागतो. बऱ्याच कामगार विधवा तर आपल्या मुलांना सुद्धा कामावर घेऊन जातात. यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. विधवांच्या अशा मुलांचे बालपण किंवा शिक्षण घेण्याच्या वयात त्यांना काबाड कष्ट करावे लागतात. गरिबीमुळे त्यांचे भविष्य असेच मजुरी करण्यातच जाते. अशा तरुण विधवांना तर लहान अपत्यांची जबाबदारी आणि त्यात तारुण्याचे ओझे. कारण समाजच काय तर कुटुंबातील पुरुष सुद्धा त्यांच्याकडे वेगळ्याच वाईट नजरेने पाहू लागतात. कमी वयाच्या विधवा मुलींना पुनर्विवाह करण्याची इच्छा असली तरी त्यांना स्वतंत्रपणे बोलण्याचा अधिकार नसतो. घरच्या व्यक्तींची या गोष्टीला सहमती मिळत नाही. काही ठिकाणी सामाजिक प्रतिष्ठेला धक्का बसेल किंवा जातीतील निर्बंधामुळे विधवेचा पुनर्विवाह केला जात नाही. तसेच काही विधवा पुनर्विवाहास अजिबातच तयार होत नाहीत. अपत्य असणाऱ्या विधवेची व तिच्या मुलांची जबाबदारी कोणी घेण्यास तयार नसते. त्यात विधवा मुलींकडून कुटुंब जबरदस्तीने पुनर्विवाह नको असे वदलून घेतात आणि याकडे दुर्लक्ष करतात. परंतु प्रेमाने समजून किंवा वस्तुस्थिती लक्षात घेऊन विधवेचा पुनर्विवाह केल्या जाऊ शकतो. यातून कित्येक विधवा महिलांना पुन्हा नव्याने आपले जीवन जगता येईल आणि नरकप्राय आयुष्यापासून सुटका होण्यास मदत होईल. परंतु समाज व कुटुंब असे करताना दिसत नाही. विधवांची ही खरी सद्यस्थिती आहे. ज्यामुळे विधवांचे पुनर्विवाह जवळपास होत नसल्याचे दिसून येते.

श्रीराम आचार्य यांच्या मते, 'समाजातील कोणतेही स्त्री-पुरुष असो किंवा विधवा-विधुर प्रत्येकाला आपले जीवन ब्रह्मचर्य राहून जगायचे, की विवाह करून हे ठरवण्याचा त्या व्यक्तीचा अधिकार असतो आणि जर पुनर्विवाहाला बंधने घालायचीच असतील, तर स्त्री-पुरुषांसाठी सारखेच असायला हवेत. सरळ सोपा उपाय इतर देश व जातीधर्माप्रमाणे हिंदूमध्ये सुद्धा विधवा विवाह होणे आवश्यक आहे. विधुर जसे पुनर्विवाह करतात तसे विधवांना देखील पुनर्विवाह करण्याची संधी देणे योग्य आहे. परंतु विधुरांचे कुमारिकेशी विवाह न होता विधवेशीच विवाहाचे बंधन असावे. जेणेकरून विधवेची जी दुर्दशा होते ती होणार नाही. विधवांचेही पर्यायाने विवाह होतील. त्यांना सुद्धा हक्काच्या घरात राहता येईल. सोबत मुलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही सुटेल आणि अनाथ मुलांची आबाळ न होता त्यांना आई-वडीलसोबत जीवन जगता येईल. यात कोणाचेच नुकसान होणार नाही. सर्वांचा लाभच होईल.'[४] परंतु आपण पाहतो पुनर्विवाहाविषयी समाजाचा दृष्टिकोन आजही बदललेला नाही. याच न बदललेल्या दृष्टिकोनामुळे विधवा महिलांना अत्यंत कमी वयापासून वैधव्याचे जीवन जगावे लागते. 'ज्या विधवांना आई-वडील नाहीत त्यांची तर फार कठीण अवस्था असते. त्यांस बटकीप्रमाणे आपल्या भावांच्या किंवा पुत्रांच्या बायकांची गुलामगिरी करावी लागते. घरात विधवा असली म्हणजे चाकर ठेवावा लागत नाही. विधवेला भावजई असली म्हणजे तिच्या जाचाखाली तिला राहावे लागते. रात्रंदिवस त्यांची भांडणे चालतात. ती सासरी राहिली तरी तेथेही

तेच. तिची सासू व नणंदा तिचा द्वेष करतात, व जागोजागी तिला मार बसतो. भांडण तंट्यापासून दूर राहावे म्हणून जर ती वेगळी राहिली, तर तिच्या अब्रूस बट्टा लागतो. तिला लेकरे असली तर ती मोठे होईपर्यंत ती त्यांच्या पोषणासाठी काबाडकष्ट करते. ती वऱ्हाडल्यावरही त्यांच्या बायकांची दासी होते. विधवा श्रीमंत असून पुत्रहीन असली तर तिचे नातलग तिला एखादा मुलगा दत्तक देतात. तो मुलगाच तिच्या जीवनाचा वारस होतो. तो मोठा झाल्यावर तिची सर्व मालमत्ता आपल्या हाती घेऊन तिला केवळ अन्न, वस्त्र देतो आणि आपल्या बायकांची चाकरी कराव्यास लावतो. विधवेची जी मालमत्ता असते त्यावर विधवेचाच काही अधिकार राहत नाही.'[५] पती निधनानंतर एकंदरीत अशी अवस्था विधवांची होताना दिसून येते. अशा विधवांना आपली आर्थिक परिस्थिती सांभाळण्यासाठी फार कष्ट सहन करावे लागतात. कुटुंबाचा सांभाळ करण्यासाठी त्यांना कमी दर्जाची कामे स्वीकारावी लागतात. जर या स्त्रियांना विवाहापूर्वीच शिक्षण दिले गेले असते, तर त्यांना भविष्यात अशा कठीण प्रसंगी आपल्या शिक्षणाचा चांगला उपयोग करून कुटुंबाचा सर्वच बाजूने व्यवस्थित सांभाळ करता येतो. विधवांच्या पुनर्विवाहापेक्षा त्यांना शिक्षण करणे शिक्षित करणे आज अत्यावश्यक आहे. कारण त्या शिक्षित झाल्या तर स्वतःचा चांगला विकास घडू शकतील. तसेच जीवनात येणाऱ्या समस्यांना योग्य मार्गाचा अवलंब करून सामोरे जाऊ शकतील. म्हणूनच सुप्रसिद्ध विचारक अरस्तु म्हणतात, "स्त्रियांच्या प्रगती किंवा अधोगतीवरच देशाची प्रगती किंवा अधोगती निर्धारित असते."[६] म्हणून विधवांच्या जीवनात शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यादृष्टीने आज आपण पाहतो समाजात काही प्रमाणात का असेना बदल होताना दिसून येत आहे.

**स्व: सक्षमीकरणाची भूमिका** :

१९७५ हे वर्ष जागतिक महिला वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. यानंतर अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय महिला संमेलन आयोजित करण्यात आले. महिलांचा सर्वांगीण विकास व्हावा, प्रत्येक क्षेत्रात होणारे शोषण अत्याचार थांबावे आणि स्त्रीला समाजात मानाने जगता यावे यासाठी तिला स्वाभिमानी, सुशिक्षित व सशक्त करण्याचे चहूबाजूने प्रयत्न होऊ लागले. त्याचे फळ म्हणजे आजच्या विवाहित, अविवाहित किंवा विधवा महिलांना त्यांच्या अधिकारांची, हक्कांची जाणीव होत आहे. पूर्वीप्रमाणे अडगळीत पडलेली विधवा आज सुशिक्षित असल्याकारणास्तव विधवा संदर्भातील सर्व कायदे, योजना आणि आपल्या हक्कांशी जाणीव ठेवून योग्य तेथे त्यांचा उपयोग करताना दिसून येते. पूर्वीप्रमाणे कुटुंबावर अवलंबून न राहता घरातील व बाहेरील कामे करत स्वाभिमानाने जगणं जगताना आजची विधवा आपणास पाहायला मिळते. जीवन जगत असताना वाट्याला येणारा अन्याय, अत्याचाराचा विरोध करण्याची ताकद जवळ बाळगते. त्याचबरोबर ग्रामीण भागातील अशिक्षित विधवा महिला सुद्धा आपण पाहतो पूर्वीप्रमाणे पांढऱ्या साडीत आणि अंधाऱ्या खोलीत राहत नसून समाजात स्वतंत्रपणे वावरत आहे. शिक्षणाच्या प्रवाहामुळे बऱ्याच प्रमाणात विधवांना आज मानाचे स्थान दिले जाते. तिच्या मतांचा कुटुंबात आदर केला जातो. पूर्वीप्रमाणे राहणीमान, खानपान इत्यादी बंधने दिसून येत नाहीत. तसेच कमी वयातील विधवांचा पुनर्विवाह करण्यास कुटुंबाची मानसिकता थोड्या प्रमाणात का असेना होताना दिसून येते. परंतु येथे हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे की, सुशिक्षित विधवांच्या तुलनेत अशिक्षित विधवांचे प्रमाण जास्त असल्याने अशा विधवांना सर्वच क्षेत्रात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मग ते कौटुंबिक क्षेत्र असो किंवा सामाजिक असो कोणत्याही कारणास्तव अपमान, निंदा, नालस्ती सहन करावी लागते. अशिक्षितच काय तर सर्व विधवा, विवाहित, अविवाहित मग त्यापैकी सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या, स्वतःच्या पायावर उभ्या असणाऱ्या अशा महिलांना समाजातील वाईट नजरांना रोजच सामोरे जावे लागते. कधी व्यभिचार तर कधी बलात्कार आणि रोजच अनुभवास येणारा वाईट दृष्टिकोन, कार्यालयातील इतर पुरुषांकडून नको तो स्पर्श, वाईट बोलणे अशा गोष्टींना तोंड द्यावे लागते. पुन्हा प्रश्न उभा राहतो तो विधवांसाठी केलेल्या कायद्यांचा किंवा यातून न झालेल्या संपूर्ण सामाजिक परिवर्तनाचा. परंतु आपण पाहतो महिलांच्या अशा परिस्थितीमुळे शासन वेळोवेळी देशात नवीन धोरणे, संमेलने, कायदे, योजना, चर्चासत्र अशा प्रकारचे अगणित प्रयत्न करते. देशाचा यामागील एकच उद्देश असतो की, प्रत्येक महिला मग ती अविवाहित, विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परितक्ता इत्यादी कोणत्याही प्रकारची असो तिला समानतेने वागणूक व संरक्षण मिळायला हवे. तिला या समाजाने दिलेला दुय्यम दर्जा संपुष्टात यायला हवा. या उद्देशांचा विचार करता, देशातील विधवा महिलांमध्ये काही प्रमाणात बदल होताना दिसून येत आहे. कारण आपण पाहतो आज समाजात बालविवाह विरोध, स्त्री शिक्षणास प्रोत्साहन, पुनर्विवाहास मान्यता दिली जात आहे. विधवांवरील अनेक जाचक बंधने पूर्वीच्या तुलनेत कमी दिसून येत आहेत. सुशिक्षित किंवा अशिक्षित असो आजची विधवा महिला स्वावलंबी बनत आहेत. घरगुती कामे, शेती, मजुरी, दगडफोड इत्यादी कामे करून स्वाभिमानाने स्वतःचा व आपल्या कुटुंबाचा सांभाळ करीत आहे. एकंदरीत प्रामाणिक कष्ट करून विधवा महिला आपले जीवन जगताना पाहावयाला मिळतात. इतकेच काय तर सुशिक्षित विधवा महिला नोकरी करत, घर सांभाळत समाजासाठी योगदान देखील देतात. काही

विधवा शिवणकाम, ब्यूटीपार्लर इत्यादी कला प्रशिक्षणातून स्वरोजगार साधतांनाही दिसून येते. म्हणजे आजच्या विधवा महिलांमध्ये संपूर्ण चांगले बदल किंवा त्यांचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. परंतु ठिकाणानुसार, परिस्थितीनुसार किंवा शिक्षणानुसार विधावांमध्ये कमी जास्त फरकाने बदल झाल्याचे लक्षात येते. अशाप्रकारे निरनिराळ्या परिस्थितीत आजच्या विधवा महिला स्वाभिमानाने जीवन जगताना दिसून येतात व स्व: सक्षमीकरणाची भूमिका बजावताना दिसून येतात.

**निष्कर्ष:**

१९ व्या शतकापासून महिलांसाठी अनेक कायदे झाले त्यात वेळप्रसंगी बदली झाले. समाजसुधारकांच्या अगणित कष्टांमुळे, संघर्षांमुळे आणि त्यांना मिळालेली कायद्याची जोड यामुळे परिवर्तन झाले आहे. आजची स्त्री शिकून स्वतःच्या पायावर उभी राहत आहे. स्वावलंबी बनत आहे. कष्ट करून विधवा महिला प्रामाणिक जीवन जगत आपल्या कुटुंबाचा सांभाळ करते. परंतु अपेक्षित किंवा संपूर्ण बदल झाले नाही. समाजात खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता निर्माण झाली नाही. समाजातील व्यक्तिंमध्ये हवे तसे परिवर्तन होऊच शकले नाही.

आज आपण २१ व्या शतकात पदार्पण केले तरी भारतीय स्त्रीला जो दर्जा मिळायला हवा तो अजून मिळालाच नाही. विधवा महिलांची प्रगती झाली; पण सर्व स्तरातून अपेक्षित प्रगती झाली नाही. आपण पाहिले की, विधवा महिलांना पुनर्विवाह करण्याचा कायद्याने अधिकार मिळाला; पण समाजाने अजूनही यास पूर्णपणे स्वीकारले नाही. बालविवाह, भृणहत्या आजच्या युगात अजूनही होतातच. यामुळे मुलींना शिक्षणास मुकावे लागते. विधवा होणे हा एक गुन्हा असल्याप्रमाणे वागणूक त्यांना मिळते. जरी सुशिक्षित असले किंवा नोकरी जरी करत असले, तरी तिला घरातील महिला सदस्याप्रमाणे प्रेमाची वागणूक मिळतच नाही. तिच्या मानसिक समस्यांना कोणी विचारत नाही. कुटुंबातील लोक तिचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यात अशिक्षित, गरीब विधवा असेल तिथे तर ती घरातील नोकरांनी बनूनच राहते. विधवांसाठी करण्यात आलेले कायदे समाजांना मनापासून किंवा पूर्णपणे स्वीकार केलेच नाही. कायद्याने विधवांना वारसा हक्क मिळाला; पण प्रत्यक्षात मिळाला नाही. पुनर्विवाह स्वीकृती कायद्याने दिली, मात्र समाजाने दिली नाही. बालविवाह अजूनही होतातच. शासनाच्या योजनांमार्फत विधवांना जे मानधन दिले जाते ते अत्यंत कमी असल्याकारणास्तव त्यात आवश्यक गरजा सुद्धा भागवल्या जात नाहीत. त्याचबरोबर या योजना प्रत्येक गरजू विधावांपर्यंत पोहचत नसल्याने अशा विधवा या योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. शेवटी पर्याय नसल्याने विधवा महिला मिळेल ते काम करून स्व: कष्ट करून स्वतःचा व कुटुंबाचा सांभाळ व्यवस्थितरित्या करते व स्व: सक्षमीकरणाची भूमिका पार पाडते.

**संदर्भ सूची:**

1. साने गुरुजी. (२००८). भारतीय संस्कृती. पुणे: कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पृ.क्र. २२
2. Kannan, Shilpa. (2013, Oct. 14). India's abandoned widows struggle survive. BBC Newsttps://www.bbc.com/news/busness24490252.amp#aoh=16576110822832&referrer=https%3A%2F%Fwww.google.com&amp_tf=From%20%251%24s visited page this o20/05/2021.Time:12:34pm
3. आहुजा, राम. (२०१०). सामाजिक समस्याऐं. जयपूर: रावत पब्लिकेशन्स, पृ.क्र.२४४-२४५
4. http://literature.awgp.org/book/Kya_Vidhva_VivahShastra_Viruddh_Hai/2021.mvisited page this on 16/05/2021.Time:11:39pm.
5. पद्मनजी, बाबा. (२००५). यमुना पर्यटन पुणे: स्नेहवर्धन प्रकाशन, पृ.क्र. १०७,२७८
6. माहेश्वरी, अविनाश. (२०११). महिला अधिकार और कानून. जयपूर: प्रिज्म बुक्स, पृ.क्र. १४१